पुण्यनगरी 15.07.2023

# कोम्बिंग ऑपरेशनमध्ये मोक्कातील आरोपी जेरबंद

**नांदेड / प्रतिनिधी**

विविध गुन्ह्यातील आरोपींच्या शोधात पोलिसांनी शहरात राबविलेल्या कोम्बिंग ऑपरेशनमध्ये मोक्का प्रकरणातील एक आरोपी पोलिसांच्या जाळ्यात सापडला.

कोम्बिंग ऑपरेशन राबवून अग्नीशस्त्र वापरून गुन्हे करणाऱ्या आरोपींची तपासणी करून त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्यात आली. नांदेड शहरात अग्नीशस्त्र वापरून गुन्हे करणाऱ्या आरोपींना कोम्बिंग ऑपरेशन राबवुन त्यांची तपासणी करून त्यांच्याविरुध्द कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश पोलिस अधीक्षकांनी दिले होते. दि.१३ जुलैच्या रात्री स्थागुशाचे पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच शहरातील भाग्यनगर, विमानतळ, शिवाजीनगर, वजिराबाद, इतवारा आणि नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या अधिकारी व अंमलदारांनी कोम्बिंग ऑपरेशन राबवून अग्नीशस्त्राचा वापर करून गुन्हे करणाऱ्या आरोपींची तपासणी करून त्यांच्यावर कारवाई केली. या कारवाईत स्थागुशाचे २ पोलीस अधिकारी आणि ६ पोलीस अंमलदारांनी भाग घेवुन अग्नीशस्त्र वापरणाऱ्या ११ आरोपींना तपासून एकाकडून खंजर जप्त केला. तसेच मुदखेड पोलिस ठाण्यात गुरनं २१/२३ कलम ३९५,सह कलम ३ / २५, मोक्का कलम ३ (१),३ (२), ३(४) मधील फरार आरोपी अजय शामराव राठोड (२७, रा. वरदडा तांडा ता. मुदखेड जि. नांदेड) यास अटक केली आहे. भाग्यनगर पोलिस ठाण्याचे ४ अधिकारी,१२ अंमलदारांनी अग्नीशस्त्र वापरणारे १८ आरोपी तपासले. विमानतळ पोलिस ठाण्याच्या अधिकारी व २० पोलिस अंमलदारांनी अग्नीशस्त्र वापरणाऱ्या १९ आरोपींची तपासणी केली. २ वॉरंट तामील केले. वजिराबाद (पान २ वर..)

